मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 11 ऑगस्ट 2024 | पान- 1

# भोसरीतील महाविकास आघाडीत 'बिघाडी'

## माजी नगरसेवक रवि लांडगे 'उबाठा' कडून संभाव्य उमेदवार! : अजित गव्हाणे, रवि लांडगे यांच्यात रस्सीखेच, सुलभा उबाळे स्पर्धेतून बाहेर?

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील महाविकास आघाडीत मोठा ट्विस्ट तयार झाला आहे. उमेदवारीवरुन इच्छुकांमध्ये मोठी रस्सीखेच पहायला मिळत आहे. भोसरीतून भाजपा आमदार महेश लांडगे यांनो रोखण्यासाठी सर्व विरोधक एकवटे आहेत. शरद पवार गटाचे अजित गव्हाणे यांना तिकीट निश्चित मानले जात असतानाच, आता रवि लांडगे यांनी शिवसेना ठाकरे गटाकडून 'फिल्डिंग' लावली आहे.

माजी नगरसेवक रवि लांडगे यांनी नुकतीच शिवसेना ठाकरे गटाचे 'फायर ब्रँड' नेते संजय राउत यांची भेट घेतली. यापूर्वीच त्यांनी खासदार ओमराजे निंबाळकर यांची भेट घेतली होती. लोकसभा निवडणुकीनंतर मिळालेल्या मोठ्या यशानंतर शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी अशा तीनही विधानसभा मतदार संघांवर शरद पवार गटाने दावा केला आहे. किंबहुना, शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी काल झालेल्या शिव स्वराज्य यात्रेच्या भोसरीतील सभेतही तशी जाहीर मागणी केली होती.

वास्तविक, सुरूवातील या मतदार संघावर शिवसेना ठाकरे गटाने दावा केला होता. शिवसेनेच्या सुलभा उबाळे आणि धनंजय आल्हाट यांनी लोकसभा निवडणुकीत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचे काम केले. शिवसेनेला मानणारा मोठा मतदार या मतदार संघामध्ये आहे. त्यामुळे हा मतदार संघ "मशाल" ला सोडावा, असा शिवसैनिकांचा आग्रह आहे. त्यातच उबाळे आणि आल्हाट यांनी निवडणूक प्रचाराला सुरूवातही केली आहे.

इतक्यात, भाजपातून राष्ट्रवादीत प्रवेशकर्ते झालेले माजी नगरसेवक रवि लांडगे हेसुद्धा निवडणुकीसाठी इच्छुक असून, त्यांनी शिवसेना 'मशाल' हातात घेण्याबाबत चाचपणी सुरू केली आहे.



### भोसरीत शिवसेनेची 50 हजार मते..

» शिवसेनेची स्वतःची अशी ५० हजार मते आजही कायम आहेत. त्यात महाआघाडीची मते एकत्र घेतल्यास विजयाची मशाल पेटणार असा दावा केला जातो आहे. विशेष म्हणजे, "भोसरी हा पहिल्यापासून शिवसेनेचा बालेकिल्ला आहे, महाआघाडीत तो आम्हीच लढणार आहे" असा दावा संजय राऊत यांनी केला आहे. तसेच, १५ ऑगस्ट रोजी भव्य कार्यक्रमात रवि लांडगे शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे सांगितले जात आहे. आता महाआघाडीचा उमेदवार नेमका कोण असेल, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. महाआघाडीत दुफळी निर्माण झाली तर त्याचा आयताच फायदा महायुतीचे आमदार लांडगे यांना होऊ शकतो, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### तिकीटासाठी महाविकास आघाडीत पेच..

» भोसरीत राष्ट्रवादीची शिवस्वराज्य यात्रेचे जंगी स्वागत झाले आणि दणदणीत सभा झाली. पक्षाचे अध्यक्ष जयंत पाटील आणि खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी धडाकेबाज भाषणे करत भाजप आमदार लांडगे यांच्यावर अप्रत्यक्ष तोफ डागली आणि एकप्रकारे प्रचाराचा नारळ फोडला. भाजपाचे महेश लांडगे यांच्या विरोधात तगडा उमेदवार राष्ट्रवादीचे अजित गव्हाणे अशी अत्यंत चुरशीची लढत होणार, अशी चर्चाही सर्वत्र सुरू झाली. अशातच आता ठाकरेंच्या शिवसेनेनेही भोसरीसाठी आग्रह धरला, तर महाविकास आघाडीत तिकीट कोणाला द्यायचे असा प्रेच निर्माण होणार आहे.

---

# 'ती' नुकसान भरपाई अधिकाऱ्यांकडून वसूल करा : माजी नगरसेवक मारुती भापकर

## नाशिक फाटा दुमजली उड्डाणपुलाच्या कामासाठी जागतिक बँकेकडून घेतलेले कर्ज डॉलरमध्ये फेडण्याच्या अटीमुळे महापालिकेला जबर फटका

**पिंपरी | प्रतिनिधी**

नाशिक फाटा दुमजली उड्डाणपुलाच्या कामासाठी जागतिक बँकेकडून २०१५ मध्ये १५९ कोटी ११ लाख कर्ज घेतले. त्या कर्जामुळे महापालिकेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची सखोल चौकशी करावी. दोषींवर कारवाई करून झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करण्याची मागणी माजी नगरसेवक मारुती भापकर यांनी केली.

याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यात भापकर यांनी म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेने कासारवाडीतून भोसरीच्या दिशेने जाणारा व भोसरीकडून पिंपळे गुरव भागाला जोडणारा अशा दोन उड्डाणपुलांच्या कामासाठी २०१५-१६ या आर्थिक वर्षात महापालिकेची आर्थिक परिस्थिती मजबूत असताना १५९ कोटी ११ लाख जागतिक बँकेकडून कर्ज घेण्याचा निर्णय घेतला. हे कर्ज २५ वर्षे फेडावे लागणार आहे. हे कर्ज डॉलरमध्येच फेडायचे आहे.

डॉलरची किंमत जशी-जशी वाढत जाईल, तशी-तशी या कर्जापोटी वाढणारी रक्कम महापालिकेला फेडावी लागणार आहे. भविष्यात डॉलरचा भाव जसा वाढत जाईल तशी या कर्जाची रक्कम वाढणार आहे. डॉलरनुसार परतफेडीच्या जाचक अटीमुळे हे कर्ज तब्बल ३० टक्के वार्षिक व्याजदराने पडत आहे. भारतातील राष्ट्रीय बँकेचा व्याजदर ७ ते १४ टक्के असताना हा ३० टक्क्याच्या दराने कर्ज घेण्याचा निर्णय कोणाच्या सुपीक डोक्यातून आला? यामुळे महापालिकेचे किती आर्थिक नुकसान झाले? याला जबाबदार कोण?



### अद्याप 207 कोटी रुपये कर्ज

» आर्थिक परिस्थिती चांगली असल्यामुळे हे कर्ज एक रकमी फेडण्याचा प्रयत्न महापालिका करत आहे. मात्र कर्जाच्या अटी-शर्ती नुसार हे कर्ज जागतिक बँक स्वीकारत नाही. महापालिकेने जागतिक बँकेकडून १५९ कोटी ११ लाखांचे कर्ज जानेवारी २०१५ मध्ये घेतले होते. आत्तापर्यंत महापालिकेने ११० कोटी रुपयांचे कर्ज फेडले आहे. अद्याप २०७ कोटी रुपये कर्ज फेडायचे आहे..

### दोषींवर कायदेशीर कठोर कारवाई करावी

» या सगळ्या प्रक्रियेमध्ये आर्थिक देवाण- घेवाण होऊन भ्रष्टाचार झाला काय? महापालिकेला कर्जबाजारी करण्याचे पाप नेमके कोणाचे? महापालिकेला कर्जबाजारी करून आपल्या तुंबड्या भरणाऱ्या संबंधित भ्रष्ट लोकांची, या एकूणच या सर्व संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कठोर कारवाई करावी.

# हडपसर मोठा, कसबा पेठ सर्वांत लहान मतदारसंघ

## पुणे शहरातील मतदारांची प्रारूप मतदार यादी जिल्हा प्रशासनाकडून प्रसिद्ध, जिल्ह्यातील 21 विधानसभा मतदारसंघात मतदारांची संख्या 84 लाख 39 हजार 729 इतकी आहे

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा प्रशासनाने प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध केली आहे. या यादीनुसार जिल्ह्यातील 21 विधानसभा मतदारसंघात मतदारांची संख्या 84 लाख 39 हजार 729 इतकी आहे. त्यानुसार जिल्ह्यात सर्वांत मोठा मतदारसंघ हा चिंचवड असून, या मतदारसंघात 6 लाख 27हजार 437 मतदार अहेत.

तर सर्वात लहान मतदारसंघ हा कसबा पेठ असून या मतदारसंघात 2 लाख 78 हजार 606 मतदार आहेत. दरम्यान, पुणे शहरात आठ विधानसभा मतदारसंघाचा समावेश होत असून शहरात सर्वांत मोठा मतदारसंघ हा हडपसर असून या मतदारसंघात 5 लाख 90 हजार 911 मतदार आहेत.

जिल्हा निवडणूक प्रशासनाने राबविलेल्या विविध उपक्रमांमुळे लोकसभेच्या तुलनेत मतदारांच्या संख्येत 3 लाख 12 हजार 710 ने वाढ झाली आहे. या प्रारुप मतदार यादीच्या अनुषंगाने २० ऑगस्टपर्यंत दावे व हरकती सादर करता येणार आहेत.

यादरम्यान मतदार यादीत नाव नसल्यास नोंदणीसाठी अर्ज नमुना क्रमांक ६, नाव समाविष्ट करण्यास हरकत, यादीत यापूर्वीच समाविष्ट असलेले नाव वगळणे, स्थलांतर झाल्यामुळे नाव वगळणे आदींसाठी नमुना क्र. ७, पत्ता बदल, तपशीलात दुरुस्ती, दुबार ई-पिक कार्ड मिळणे आदींसाठी नमुना क्र. ८ हे अर्ज ऑनलाइन भरता येतील.

त्याशिवाय संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडे आवश्यक पुराव्यांसह अर्ज सादर करता येतील, असेही निवडणूक शाखेकडून सांगण्यात आले.



### पिंपरी-चिंचवड शहरातील विधानसभा मतदारसंघ

| विधानसभा | मतदारांची संख्या |
|---|---|
| » चिंचवड – | 6,27,437 |
| » पिंपरी - | 3,77,251 |
| » भोसरी - | 5,58,959 |

### पुणे शहरातील विधानसभा मतदारसंघ

| विधानसभा | मतदारांची संख्या |
|---|---|
| » वडगावशेरी – | 4,76,538 |
| » शिवाजीनगर – | 2,81,831 |
| » कोथरुड – | 4,21,079 |
| » खडकवासला - | 5,45,893 |
| » पर्वती – | 3,44,739 |
| » हडपसर – | 5,90,611 |
| » पुणे कॅन्टोन्मेंट – | 2,86,518 |
| » कसबा पेठ - | 2,78,606 |

### ग्रामीण भागात विधानसभा मतदारसंघ

| विधानसभा | मतदारांची संख्या |
|---|---|
| » जुन्नर – | 3,14,839 |
| » आंबेगाव – | 3,04,266 |
| » खेड-आळंदी – | 3,57,105 |
| » शिरूर – | 4,45,300 |
| » दौंड – | 3,07,042 |
| » इंदापूर – | 3,25,540 |
| » बारामती – | 3,71,577 |
| » पुरंदर – | 4,36,414 |
| » भोर वेल्हा मुळशी- | 4,12,414 |
| » मावळ - | 3,75,770 |

# खड्डे उठले जिवावर!अनेक जण गंभीर जखमी, पुणेकरांमध्ये संताप

## पालिकेच्या उदासीन कारभारामुळे अनेकांना अपंगत्व येण्याची शक्यता, पावसावर खापर फोडून अपयश झाकण्याचा प्रयत्न

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील जवळपास सर्वच भागांमध्ये आणि रस्त्यांवर जागोजाग खड्डे पडलेले आहेत. खड्ड्यांवरून राजकारण देखील तापलेले आहे. या खड्ड्यांवर कोट्यवधी रुपयांचा खर्चदेखील झालेला आहे. आता हेच खड्डे नागरिकांच्या जिवावर उठू लागले आहेत. खड्ड्यांचा अंदाज न आल्याने वाहनचालक विशेषत: दुचाकीचालकांचे अपघात होऊन त्यांच्या मणक्याला आणि हाडांना मार लागून गंभीर स्वरूपाच्या दुखापती झाल्या आहेत.

खड्ड्यात गाड्या आदळल्याने चालकांच्या मणक्याला हादरा बसून कायमस्वरूपी अपंगत्व येण्याची भीती निर्माण झाली आहे. पुण्याच्या वेगवेगळ्या भागात घडलेल्या या तीन अपघातांमध्ये गंभीर जखमी झालेल्या नागरिकांनी आपबिती व्यक्त केली. यातील एका नागरिकाच्या चेहऱ्याला फ्रॅक्चर झाले असून दुसऱ्या नागरिकाच्या उजव्या बाजूच्या दंडाचे हाडच तुटले आहे. तिसऱ्या अपघातात एका वकिलाच्या गुडघ्याला गंभीर दुखापत झाली आहे. पुणे महापालिकेकडून मात्र पावसावर खापर फोडून आपल्या कामाचे अपयश झाकण्याचा प्रयत्न केला जात आहे.

गाडी बाजूला घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांची दुचाकी खड्ड्यात आदळली. या खड्ड्यात पाणी भरलेले असल्याने तो त्यांना दिसलाच नाही.ते दुचाकीसह रस्त्यावर पडले. खड्ड्याच्या कोपऱ्यावर त्यांचा चेहरा आदळला. त्यामुळे त्यांच्या डोळ्याखालील हाडाला जबर इजा झाली.



### अनेकांना रुग्णालयात शस्त्रक्रिया

» मणक्याचे आणि हाडांचे आजार, पाठदुखी, कंबरदुखीचे आजार असलेल्या नागरिकांना खड्ड्यांचा हा दणका सहन होत नाही. दुचाकी खड्ड्यात आदळल्याने चालक रस्त्यांवर आपटतात. दुचाकी घसरून पडते. वाहनांचे नुकसान होते ते वेगळेच. वाहनचालकांना हाड मोडणे, मणक्याला दुखापत होणे, खरचटणे याला तोंड द्यावे लागते. डॉक्टरांकडे जाऊन उपचार घेण्यासाठी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो तो वेगळाच. गंभीर दुखापत झाल्याने अनेकांना रुग्णालयात शस्त्रक्रिया करून घ्यावी लागत आहे.

### भर पावसात खड्डे बुजवणे पडले महागात

» शहरातील रस्त्यांची अक्षरश: चाळण झाली आहे. खड्ड्यांवरून नागरिक संतापल्यावर पालिकेच्या पथ विभागाने भर पावसात खड्डे बुजवण्याचा पराक्रम केला. त्यामुळे डांबर, खडी, कॉंक्रिट तग धरू शकले नाही. पाऊस उघडताच ही खडी रस्त्यावर पसरू लागली. त्यामुळे वाहने घसरून अपघात घडू लागले आहेत. यासोबतच खड्ड्यांमध्ये पाणी भरल्यामुळे तसेच रात्रीच्या अंधारात खड्डे न दिसल्याने त्यामध्ये दुचाकी आदळून अपघात घडण्याचे प्रमाण वाढू लागले आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिका भ्रष्टाचाराचा अड्डा बनली

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचा गंभीर आरोप

**पिंपरी | प्रतिनिधी**

नगरपरिषदा, महानगरपालिका नागरिकांना सोयीचे व्हावे म्हणून निर्माण झाल्या. मात्र सध्या जाणीवपूर्वक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबविल्या जात आहेत. स्थानिक आमदार आपल्या सोयीने येथे अधिकारी आणतात. यातून मनमानी कारभार केला जातो. अशाच पद्धतीने पिंपरी चिंचवड पालिकेचाही कारभार सुरू असून सध्याच्या घडीला पिंपरी चिंचवड पालिका भ्रष्टाचाराचा अड्डा बनली आहे असा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केला.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान शिवनेरी किल्ल्याच्या पहिल्या पायरीचे दर्शन घेऊन महाराष्ट्रात रयतेचे राज्य आणण्याचा निर्धार करत शुक्रवारी (दि. 9) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा सुरू झाली. यात्रा सध्या भोसरी पर्यंत पोहोचली असून भोसरीमध्ये यात्रेचे रूपांतर सभेत झाले. यावेळी जयंत पाटील बोलत होते. सभेला माजी मंत्री अनिल देशमुख, खासदार अमोल कोल्हे, युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी महापौर आझमभाई पानसरे, मोहिनी लांडे स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे, ज्येष्ठ नेते रविकांत वर्पे, माजी नगरसेवक गिता मंचरकर, गणेश भोंडवे, धनंजय भालेकर, प्रविण भालेकर,संजय नेवाळे, पंकज भालेकर, समिर मासुळकर, सुधीर मुंगसे, तानाजी खाडे, देवेंद्र तायडे, विशाल काळभोर, ज्ञानेश आल्हाट, प्रदीप तापकीर, संजय उदावंत, विशाल जाधव आदी उपस्थित होते.



जयंत पाटील पुढे म्हणाले, महाराष्ट्र शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या मागे ताकदीने उभा आहे. हे आपण लोकसभा निवडणुकांच्या निमित्ताने पाहिले. महाराष्ट्रातील 48 पैकी 31 जागांवर भाजपला नागरिकांनी नाकारले. याचे मुख्य कारण म्हणजे भ्रष्टाचार हे होते. भाजपचे लोक देशाची घटना बदलायला निघाले होते याची खात्री नागरिकांना पटली. विधान परिषदेत अनेकदा अनेक मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित केल्यानंतर एकाही मंत्र्याला उत्तर देता आले नाही. महाराष्ट्रात भ्रष्टाचार अक्षरशः कळसाला पोहोचला आहे. हेच पिंपरी चिंचवड महापालिकेतही दिसून येत आहे म्हणूनच लोकसभेला परिवर्तनासाठी नागरिक पुढे आले तसेच परिवर्तन विधानसभेलाही होणार आहे.

अमोल कोल्हे यांनी सभेमध्ये बोलताना भोसरी विधानसभेतील आमदारांचा खरपूस समाचार घेतला. नाशिक फाटा ते चांडोली कॅरीडोरबद्दल बोलताना ते म्हणाले या कामासाठी सुरुवातीपासून मी जो खर्च सांगितला आजही तो आकडा तेवढाच आहे.मात्र भोसरीमध्ये जादू होते. भोसरीतील शितल बाग येथील पादचारी पुल 70 लाखावरून सात कोटीचा कसा झाला. पालिकेच्या दीडशे शाळांच्या ई लर्निंगच्या 43 कोटीच्या कंत्राटाचे काय झाले. अर्बन स्ट्रीटसाठी 45 कोटी घालून एका नाहक निष्पाप जीवाचा बळी जातो. एकीकडे इंद्रायणी थडी भरवायची, दुसरीकडे नमामि इंद्रायणी म्हणत इंद्रायणी माईच्या नावाखाली पैसे लाटायचे. इंद्रायणी नदीच्या स्वच्छतेसाठी तब्बल 1400 कोटी रुपये आतापर्यंत खर्च झाले आहेत असे असतानाही दर दिवशी इंद्रायणी नदी फेसाळत असेल तर कोणत्या एसटीपी प्लांट मधून पाणी प्रक्रिया न करता पाणी सोडले जाते हे देखील पहावे लागेल. माझ्या कामात कुणी लक्ष घालत असेल तर मलाही त्यांच्या कामात लक्ष घालावे लागेल असे म्हणत त्यांनी एक प्रकारे भोसरीतील स्थानिक आमदारांना इशारा दिला.असा कारभार करण्यासाठी मोकळे रान मिळावे म्हणूनच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबवल्या जात आहेत आणि याबाबत गेली 14 वर्ष पालकमंत्री असलेले चकार शब्द बोलत नाही . पालकमंत्री या कारभाराची चौकशी लावणार का असेही कोल्हे यावेळी म्हणाले.

जयंत पाटील सभेत म्हणाले अजित गव्हाणे तुम्ही यायला उशीर का केला? तुम्ही थोडे लवकर आमच्याकडे आला असता तर शिरूर मतदार संघाचे भोसरीतील घटलेले साडेआठ हजाराचे लीड वीस पंचवीस हजारांनी वाढले असते. पण ठीक आहे देर आये मगर दुरुस्त आये.

### शहरात भाजपाचा मनमानी कारभार..

**» शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने आयोजित सभेमध्ये अजित गव्हाणे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकी बद्दलचा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. गव्हाणे म्हणाले जाणीवपूर्वक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबवल्या जात आहे. महानगरपालिका नगरपालिकांमध्ये सदस्य नसल्याने महायुतीचे फावले आहे. हेच चित्र पिंपरी चिंचवड महापालिकेत आहे स्थानिक आमदारांनी मन मानेल त्या पद्धतीने कारभार केला त्यामुळे संपूर्ण शहर खड्डयात गेल्याचे चित्र आहे.**

# शहरात घरोघरी तिरंगा मोहिमेस महापालिकेच्या वतीने प्रारंभ

## आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिका व इनोव्हेटीव स्कूल मोशीतर्फे तिरंगा रॅली

**पिंपरी | प्रतिनिधी**

घरोघरी तिरंगा मोहिम ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान राबविण्याच्या सूचना राज्यशासनामार्फत प्राप्त झाल्या असून आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिका व इनोव्हेटीव स्कूल मोशी यांच्या वतीने आज तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीचा प्रारंभ उपआयुक्त अण्णा बोदडे यांच्या हस्ते झाला.

या रॅलीदरम्यान पिंपरी चिंचवड महापालिकेचे क्षेत्रीय अधिकारी तथा उप आयुक्त अण्णा बोदडे, पिंपरी चिंचवड वाहतूक विभागाचे वरिष्ठ निरीक्षक सुरज पवार तसेच आशिष काळदाते, वैभव फापडे, धनराज नाईकवाले, इनोव्हेटिव्ह शाळेचे अध्यक्ष संजय सिंग, प्रशांत पाटील, आरोग्य विभागाचे तानाजी दाते तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे आनंद नागरे, आनंद मोरे सहभागी झाले होते. तसेच भालचंद्र देशमुख, भिकाजी थोरात या जेष्ठ नागरिकांनीही या मोहिमेत उत्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त यावर्षीही राज्य शासनाच्या वतीने घरोघरी तिरंगा ही मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भव्य रॅलीच्या माध्यमातून या मोहीमेस घरोघरी प्रारंभ करण्यात आला. या भव्य रॅलीत चिखली येथील इनोव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूलमधील ७०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत जल्लोषात्मक घोषणाबाजी केली.



चिखली जाधववाडी येथील सीएनजी पंप ते शाळेपर्यंत ३ किलोमीटर पायी रॅली काढण्यात आली. या रॅलीदरम्यान पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारात प्रवेश करताच सर्व नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. या चिमुरड्यांच्या सहभागाने हर घर तिरंगा रॅली उत्साह आणि जल्लोषात्मक वातावरणात पार पडली.

''घरोघरी तिरंगा'' मोहीम राबवण्यासाठी केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या वतीने मार्गदर्शन सूचना जारी करण्यात आल्या आहे. त्यानुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी दिलेल्या सूचनांचे पालन करून विविध उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी तात्काळ नियोजन करण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. या मोहिमेत घेण्यात येणारे तिरंगा यात्रा, तिरंगा रॅली, तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फीज, तिरंगा ट्रिब्युट, तिरंगा मेळा असे विविध उपक्रम महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहेत.

यावेळी वरिष्ठ निरीक्षक सूरज पवार यांनी विद्यार्थ्यांना स्कूल बसमधून प्रवास करताना किंवा रस्त्यावरून चालताना घ्यावयाची काळजी आणि सुरक्षेच्या उपाययोजनांविषयी मार्गदर्शन केले.

### देशभक्तीची भावना जनजागृती..

**» नागरिकांच्या मनात देशभक्तीची भावना आणि राष्ट्रध्वजाबद्दल जनजागृती करण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत असून यावर्षी सुद्धा हर घर तिरंगा मोहीम उत्साहात साजरी करण्यात यावी हे राज्य शासनाचे धोरण आहे. त्यानुसार सर्व नागरिकांनी हर घर तिरंगा मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.**

# पनवेल-नवी मुंबई विमानतळाचे काम लवकरात लवकर पूर्ण करा

## नवीन विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव द्या : खासदार श्रीरंग बारणे यांची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

दिवसेंदिवस विमानाने प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढत असल्यामुळे विमानतळांवर आता रेल्वे स्टेशन सारखी गर्दी होऊ लागली आहे. पुणे व मुंबई विमानतळावरील वाढता ताण कमी करण्यासाठी पनवेल-नवी मुंबई येथे होत असलेल्या नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम शासनाने लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केली.




केंद्र शासनाच्या वतीने मांडण्यात आलेल्या भारतीय विमान विधेयक 2024 वर लोकसभेत सुरू असलेल्या चर्चेत खासदार बारणे यांनी वरील मागणी केली. खासदार बारणे म्हणाले की, सद्यस्थितीत भारतात 157 विमानतळ आहेत. देशातील वाढत्या लोकसंख्येनुसार विमानतळे वाढण्याची आवश्यकता आहे. एका अहवालानुसार 16 कोटी लोक विमानाने प्रवास करत आहेत. 3 कोटी लोक पहिल्यांदा प्रवास करत आहे. 2030 पर्यंत विमानाने प्रवास करणाऱ्यांची संख्या 30 कोटींपर्यंत जाऊ शकते.

जानेवारी ते जून 2024 दरम्यान 7 कोटी 93 लाख लोकांनी देशाअंतर्गत विमान प्रवास केला. गेल्यावर्षी 7 कोटी 60 लाख लोकांनी प्रवास केला होता. काही खासगी कंपन्या विमानाचे उड्डाण रद्द केल्यानंतर त्याचे पैसे परत करत नाहीत. मनमानी केली जाते. हे टाळण्यासाठी नवीन विमानतळ झाली पाहिजेत, असे बारणे म्हणाले. प्रवशांना सोयी-सुविधा दिल्या पाहिजेत. विमानतळावरील कर्मचा-यांना सौम्य बोलणे, यात्री सेवेसंबंधी प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे, अशी सूचनाही त्यांनी केली.

पुणे विमानतळ हे संरक्षण विभागाचा सर्वाधिक वावर असलेले विमानतळ आहे. अनेक विमानांचे उड्डाण तेथून होते. त्यामुळे अनेकदा अडचणी येतात. त्यामुळे पुण्यात नवीन विमानतळ निर्माण करण्याबाबत पाऊले उचलावीत. देशात केंद्र आणि राज्य सरकार विमानतळाची निर्मिती करतात. मुंबईतही विमानतळावर मोठे गर्दी होत आहे. त्यासाठी एअरलाईन्सकडून प्रवाशांना दोन - तीन तास अगोदर विमानतळावर बोलविले जाते. या पार्श्वभूमीवर आपल्या मतदारसंघातील पनवेलमधील विमानतळ लवकरात-लवकर सुरु करावे, अशी मागणी बारणे यांनी केली.

### 'नव्या विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव द्यावे'

» मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेलमध्ये नवी मुंबई विमानतळ बनत आहे. या विमानतळावरुन 2025 मध्ये विमानांचे उड्डाण होईल. विमानतळासाठी जमिनी अधिग्रहण करताना लोकनेते दि.बा.पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोठे आंदोलन झाले होते. आंदोलनादरम्यान तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला होता. स्थानिक नागरिकांची विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी केली आहे. याबाबतचा ठराव राज्य सरकारने पाठविला आहे. त्यालाही केंद्र शासनाने मान्यता द्यावी, या मागणीचा बारणे यांनी पुनरुच्चार केला.

# पुरवठादारांनी ड्रग्ज तस्करीचा बदलला पॅटर्न

## उपनगरांना केले लक्ष्य : महामार्गानजीक असणाऱ्या ठिकाणांना विशेष प्राधान्य

**पुणे | प्रतिनिधी**

ललित पाटील प्रकरणामुळे पुण्यातील ड्रग्ज तस्करीचे कारनामे समोर आले. इतकच नाही तर रोज नवनवीन माहिती समोर येत आहे. पोलिसांनीदेखील याकडे गांभीर्याने पाहिल्याने ड्रग्ज पुरवठादारांनी आता आपल्या ठिकाणांसह तस्करीचा पॅटर्नही बदलून टाकला आहे. तस्करीसाठी आता महिला, मुलींचा वापर करण्यास सुरुवात केली आहे, तर पुरवठादारांनी उपनगरासंह शहराच्या हद्दीनजीक असणाऱ्या गावांवर लक्ष्य केंद्रित केले असल्याचे नुकत्याच कात्रज येथे सापडलेल्या 21 लाखांच्या मेफेड्रोन घटनेवरून समोर आले आहे.



पुण्याची ओळख आता ड्रग्जचे शहर म्हणून झाली आहे. ललित पाटील प्रकरणानंतर पबमध्ये घडत असलेल्या घडामोडींमुळे, तर ड्रग्ज तस्करीचे किती मोठे रॅकेट असेल याची प्रचिती येते. ३० सप्टेंबर २०२३ रोजी ससून रुग्णालयाच्या गेटजवळ तब्बल दोन कोटी रुपयांचे मॅफेड्रॉन हे ड्रग्ज आढळून आले होते आणि इथपासूनच ड्रग्जचे पुणे कनेक्शन उघड होण्यास सुरुवात झाली. परंतु, अद्यापही त्याच्या मुळापर्यंत पोहोचणे पोलिसांना शक्य झाले नाही. शहरातील पबमध्ये ड्रग्जचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याचे स्पष्ट झाल्याने सर्वांचे लक्ष आता शहरातील हालचालींवर केंद्रित झाले आहे. पोलिसांनी ड्रग्ज तस्करीच्या संबंधित असणाऱ्या व्यक्तींच्या मुसक्या आवळल्या आहेत, तर पबसाठी कडक नियमावली तयार केली असून, गेल्या काही दिवसांपासून शहरातील पब बंद आहेत.

ड्रग्जचा पुरवठा आणि तस्करी कोरेगाव पार्क, कल्याणीनगर त्याचबरोबर खराडीसारख्या उच्चभ्रू भागात होत असल्याने पोलिसांनी या भागावरच सर्वाधिक लक्ष्य केंद्रित केले आहे. यामुळे पुरवठादारांनी उच्चभ्रू भागातील आपली ठिकाणे बंद करून आपला मोर्चा शहराच्या उपनगरांकडे वळवला आहे. विशेष करून त्या ठिकाणावरून महामार्ग जवळच असेल अशी ठिकाणी निवडली असल्याची चर्चा सध्या सुरू झाली आहे. पुरवठादारांनी केवळ आपली ठिकाणेच बदलली नाही तर तस्करीचा पॅटर्नदेखील बदलला आहे. पूर्वी तरुणांकडून ड्रग्जची तस्करी व्हायची आता मात्र, यामध्ये बदल करून तरुणींकडून तस्करी करवून घेतली जात असल्याचे सूत्रांची माहिती आहे.

### लघुउद्योगांकडे लक्ष्य द्यायला कोणालाच नाही वेळ

» महामार्गालगत असलेल्या उपनगरांसह पुण्याच्या नजीक असणाऱ्या कुरकुंभ, मुळशी, खेड-शिवापूर, रांजणगाव गणपती, चाकणसारख्या औद्योगिक महामंडळांमध्ये (एमआयडीसी) अनेक लघुउद्योग सुरू आहेत. महामंडळ वीज आणि पाणी देते. त्यानंतर हे लघुउद्योग सुरू झाले आहे की नाही, कोणत्या प्रकारचे उत्पादन घेत आहे तसेच सक्षम सुरक्षायंत्रणा आहे की नाही बाधंकाम पूर्ण झाले की नाही याची अपवाद वगळता कधीही पाहणी केली जात नाही. कुरकुंभ एमआयडीसीमध्ये आतापर्यंत ड्रग्ज संदर्भात तीन कंपन्यांवर कारवाई झाल्या आहेत. या कंपन्या काही मोठ्या नाही तर लघु उद्योगच होते. औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचलनालय विभागाकडून जोपर्यंत प्रमाणपत्र दिले जात नाही तोपर्यंत लघु उद्योगांना उत्पादन सुरू करता येत नाही. ड्रग्ज प्रकरणांमध्ये कुरकुंभ एमआयडीसीतील समर्थ लॅबोरेटरी, सुजलाम केमिकल आणि अर्थकेम कंपन्यांवर कारवाई करण्यात आली त्यांना या विभागाची परवानगीच मिळाली नसल्याचे समोर आले होते. त्यामुळे आता ड्रग्जसाठी या कंपन्याचा वापर केला जात असल्याचे समोर येऊन सुद्धा लघुउद्योगांकडे एमआयडीसी प्रशासनाकडून कोणतीही उपाययोजना केली जात नाही किंवा पोलिस प्रशासनाचेहीदेखील याकडे लक्ष्य जात नाही.